# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २९/०६/२०२४ (शनिवार) सकाळ

---

**पो.स्टे. रामटेक हद्दीत जुगार अड्डयावर धाड**

**—: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—**

दिनांक २८/०६/२०२४ रोजी पोस्टे रामटेक येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, नगरधन येथे राहणारे विलास डाखोळे यांचे घराचे बाजूला खाली जागेत काही इसम ५२ ताशपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळ खेळत आहे. अशा खात्रीशीर माहिती वरून पोस्टे रामटेक हद्दीत नगरधन येथे राहणारे विलास डाखोळे यांचे घराचे बाजूला खाली जागेत स्टाफचे मदतीने सापळा रचुन रेड केली असता काही इसम हे ताशपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळताना दिसुन आले. त्यामध्ये **आरोपी नामे— १) हरिष अविनाश सहारे, वय २८ वर्ष २) प्रफुल बालकदार बोरकर वय २७ वर्ष, ३) शशांक विजय दुपारे वय २७ वर्ष, ४) सुरज रमेश गाते वय २१ वर्ष ५) दुर्गेश सदुजी तरारे वय ३१ वर्ष, ६) शुभम नामदेव नान्हे वय २७ वर्ष ७) प्रविण मोतीराम तरारे वय २९ वर्ष ८) मनमोहन दयाराम सिंग वय ३५ वर्ष ९) मंगल श्रावण ठाकरे वय ४९ वर्ष, १०) विलास निलकंठ डाखोरे, वय ४३ वर्ष, सर्व रा. नगरधन ता. रामटेक** हे हारजितचा जुगार खेळ खेळतांनी मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातील १) अंगझडतीतून नगदी रक्कम २२००/—रू. व डावावर २२०/—रू. तसेच ५२ तासपत्ते २) १ निळया रंगाचा ओपो कंपणीचा मोबाईल किंमती ५०००/— रू, १ काळया रंगाचा टेक्नो कंपणीचा मोबाईल किंमती ५०००/— रू, १ निळया रंगाचा व्हिवो कंपणीचा मोबाईल किंमती १५०००/—रू., १ निळया रंगाचा आयटेल कंपणीचा मोबाईल किंमती १०००/— रू असे एकुण ४ मोबाईल किंमती २६०००/— रू. असा एकुण २८४२०/— रू. चा मुददेमाल जप्त करून आरोपींविरूद्ध पोस्टे रामटेक येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोनि प्रशांत काळे, पोहवा गजानन माहुरे, पोलीस अंमलदार शिवशंकर भोयर यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर